बृहन्मुंबई महानगरपालिका

No. A.E. /SWM/9429/S Dt. 17.11.2026

विषय: 'एस' विभागातील मॅनिंग व मॉपिंग योजना अंतर्गत सहा महिन्याच्या कालावधीसाठी अशासकीय संस्थेची नियुक्ति करणेबाबत.

स्वारस्य अभिव्यक्ती

स्वच्छतेच्या विविध योजनाद्वारे संस्थेची नियुक्ति करण्यासाठी `एस` विभाग कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छुक स्थानिक नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, स्थानिक मंडळे, बचत गट अशासकीय संस्था इ. संस्थेमार्फत कामगारांचा पुरवठा करण्याकरीता संस्थांची पात्रता यादी तयार करुन लॉटरी पद्धतीने संस्थांची निवड करुन काम करण्याकरीता अर्ज मागवीत आहे.

अनु.क्र.	कार्यरत योजना	निविदा छाननी शुल्क
1	मॅनिंग व मॉपिंग योजना	3993/- + 18 टक्के GST

`एस` विभाग कार्यालयातील सहा. अभि. (घ.क.व्य.) खातेमार्फत उपरोक्त नमुद योजनकरीता निविदा रक्कम सहा महिन्याच्या कालावधीसाठी दि. 18.11.2026 ते दि. 25.11.2026 रोजी सायं. 05.00 वाजेपर्यंत संस्थांकडुन अर्ज स्विकारुण निविदा छाननी शुल्क रोख स्वरुपात (ना-परतावा) नागरिक सुविधा केंद्र (C.F.C.) येथे चलणाद्वारे भरण्यात केल्यानंतर निविदा देण्यात येईल. निविदा अर्ज जमा करण्याची विस्तृत सूचना दि. 26.11.2026 रोजी सहा. अभि. (घ.क.व्य) `एस` विभाग कार्यालयाच्या सुचना फलकावर लावण्यात येईल. त्यानुसार सर्व संस्थेने आपले अर्ज या कार्यालयाकडे सादर करतेवेळी आपले सर्व मुळ कागदपत्रे आणुन या कार्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत आपल्या संस्थेचे अध्यक्ष/सचिव/खजिनदार आणून पडताळणी करुनच सादर करावे. पडताळणी करण्यात न आलेले अर्ज स्वारस्य अभिव्यक्तिकरीता पात्र म्हणुन ग्राह्य धरण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी. पडताळणीमध्ये पात्र ठरल्यानंतर स्वीकारलेल्या अर्जाच्या आधारे पात्रता यादी तयार करुन लॉटरी पद्धतीने संस्थांची निवड करण्यात येईल. यशस्वी ठरलेल्या संस्थांना योजनांच्या अटी व शर्तीनुसार स.मु.प./सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) कामाचे वाटप करतील.

ईच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी सहा. अभि. (घ.क.व्य.)`एस` विभाग कार्यालयात संपर्क करावा. `एस` विभाग कार्यालयात ईच्छुक संस्थांनी अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. 25.11.2026 रोजी सायं. 05.00 वाजेपर्यत असेल. त्याचप्रमाणे निविदा अर्ज जमा करण्याची सूचना दि. 26.11.2026 रोजी सहा. अभि. (घ.क.व्य) `एस` विभाग कार्यालयाच्या सुचना फलकावर लावण्यात येईल. सुचनेमध्ये नमुद केलेल्या विहित कालावधीमध्येच फक्त अर्ज स्विकारले जातील तद्नंतर आलेल्या कोणत्याही अर्जाचा विचार करण्यात येणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

टिप- माहे. एप्रिल- 26 ते सप्टेंबर- 26 कालावधीकरीता मॅनिंग व मॉपिंग योजना अंतर्गत पात्रता यादीतील संस्थांकडुन निविदा रक्कम भरुन निविदा अर्जच स्विकारण्यात येईल.

सही/-

सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) `एस` विभाग